Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843
दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

इम्पिरियल इंटरनॅशनल स्कूल,येथे आषाढी एकादशी साजरी (पान २ वर)



। शनिवार, दि. २५ जूलै २०२६ । वर्ष १ । अंक १०७ । पाने २ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

## Selected

### ८ चेंडूत अर्धशतक! वैभव सूर्यवंशीचा ऐतिहासिक पराक्रम

हरारे | भारताचा १५ वर्षीय युवा फलंदाज वैभव सूर्यवंशी याने झिम्बाब्वेविरुद्ध हरारे येथे झालेल्या सामन्यात ऐतिहासिक कामगिरी करत क्रिकेटविश्वाचे लक्ष वेधून घेतले. त्याने अवघ्या १८ चेंडूंमध्ये अर्धशतक पूर्ण करत पुरुष आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वात कमी वयात अर्धशतक झळकावणारा खेळाडू होण्याचा मान पटकावला.आक्रमक फलंदाजी करत झिगोलंदाजांवर चौफेर फटकेबाजी केली. त्याच्या तुफानी खेळीमुळे भारतीय संघाला दमदार सुरुवात मिळाली आणि संघाच्या विजयात त्याचा मोठा वाटा राहिला. या खेळीदरम्यान वैभवने अनेक विक्रम मोडीत काढत आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये नवा इतिहास रचला. केवळ १५व्या वर्षी अशी विस्फोटक खेळी करत त्याने भारतीय क्रिकेटला नवा उगवता तारा मिळाल्याची प्रचिती दिली..


## दिल्लीतील विद्यार्थ्यांना मुंबईतून पाठिंबा, उद्धव ठाकरेंचा थेट इशारा

# लाठ्या-बंदुका आणा; मी तिरंगा घेऊन येतो!

### मुंबईतील विद्यार्थी आंदोलनात ठाकरेंची केंद्रावर जोरदार टीका

**जन सम्राट टाईम्स**

**मुंबई। नीट (NEET) पेपरफुटी प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर देशभरात सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनाचे पडसाद आता मुंबईतही उमटले असून, दिल्लीतील जंतर-मंतरवरील आंदोलनाला पाठिंबा दर्शवण्यासाठी दादर येथील छत्रपती शिवाजी महाराज पार्क मैदानावर हजारो विद्यार्थी एकत्र आले.**



या आंदोलनात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, युवा नेते आदित्य ठाकरे तसेच मनसे नेते अमित ठाकरे यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना पाठिंबा दिला. आंदोलनाला संबोधित करताना उद्धव ठाकरे यांनी केंद्र सरकारवर जोरदार हल्लाबोल केला. "आज या मैदानावर जमलेली गर्दी कोणत्याही एका पक्षाची नाही. ही देशाच्या भवितव्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या न्यायासाठी एकत्र आलेल्या भारतीयांची ताकद आहे. भीती दाखवून राज्य करणाऱ्यांना आता जनतेचा आवाज ऐकावा लागेल," असे ते म्हणाले. दिल्लीतील विद्यार्थी आंदोलनादरम्यान झालेल्या पोलिस लाठीचार्जचा उल्लेख करत उद्धव ठाकरे यांनी सरकारला थेट इशारा दिला. "तुमच्या हातात लाठ्या असतील, बंदुका असतील; पण आमच्या हातात तिरंगा आहे. या तिरंग्याशी लढण्याची हिंमत आजपर्यंत कोणाची झाली नाही. या... लाठ्या-बंदुका घेऊन या, मी तिरंगा घेऊन येतो. पाहूया, तिरंगा जिंकतो की हुकूमशाही," असे आव्हानात्मक वक्तव्य त्यांनी केले. त्यांच्या या विधानाला उपस्थित विद्यार्थ्यांनी टाळ्यांच्या कडकडाटात प्रतिसाद दिला. उद्धव ठाकरे यांनी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला नैतिक पाठिंबा देत परीक्षा व्यवस्थेतील पारदर्शकता आणि विद्यार्थ्यांच्या भविष्याशी होणारा खेळ थांबवण्याची गरज व्यक्त केली.

### राज्यातील राजकीय वातावरणही तापले

विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर सरकारने संवेदनशीलतेने भूमिका घ्यावी आणि आंदोलन दडपण्याऐवजी संवादाचा मार्ग स्वीकारावा, असेही त्यांनी नमूद केले. दरम्यान, दिल्लीतील जंतर-मंतर येथे नीट पेपरफुटी प्रकरणाच्या निषेधार्थ सुरू असलेल्या आंदोलनाला देशभरातून प्रतिसाद मिळत आहे. विविध राज्यांमध्ये विद्यार्थी, युवक संघटना आणि अनेक सामाजिक-राजकीय पक्ष रस्त्यावर उतरले असून, केंद्र सरकारवर परीक्षा व्यवस्थेतील त्रुटी दूर करण्यासाठी दबाव वाढत आहे. मुंबईतील शिवाजी पार्कवरील आंदोलनामुळे राज्यातील राजकीय वातावरणही तापले आहे.



देवशयनी आषाढी एकादशीनिमित्त सर्वांना मंगलमय शुभेच्छा!
-' जन सम्राट टाईम्स, परिवार

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज

## पंढरपूर विशेष रेल्वेचे धरणगावात स्वागत!

### युवासेनेकडून वारकऱ्यांना फराळ वाटप



**जन सम्राट टाईम्स**

**धरणगाव| प्रतिनिधी:** आषाढी वारीनिमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी जाणाऱ्या वारकरी भाविकांच्या सोयीसाठी सुरू करण्यात आलेल्या उधना–मिरज (पंढरपूर) विशेष रेल्वेचे धरणगाव रेल्वे स्थानकावर शिवसेना व युवासेनेच्या वतीने उत्साहात स्वागत करण्यात आले. राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या प्रेरणेने तसेच जिल्हा परिषद सदस्य युवा नेते प्रतापराव (प्रतापभाऊ) पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली वारकरी भाविकांना फराळाचे वाटप करण्यात आले. विशेष रेल्वे धरणगाव स्थानकावर दाखल होताच वारकऱ्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. पंढरपूरच्या दिशेने विठ्ठल दर्शनासाठी निघालेल्या भाविकांना प्रेमपूर्वक फराळाचे वाटप करण्यात आले. अल्पावधीत शिस्तबद्ध पद्धतीने पार पडलेल्या या उपक्रमाला वारकरी भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सेवाभावातून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाबद्दल भाविकांनी समाधान व्यक्त करत आयोजकांचे आभार मानले. यावेळी प्रतापभाऊ पाटील, दिनेशभाऊ कडोसे (पाळधी), गोपालभाऊ (बांभोरी), दीपकभाऊ भदाणे (बिलखेडा), गणेशभाऊ भिंगणे (श्यामखेडा), रोहितभाऊ पाटील (बाभळे), मंगेशभाऊ पाटील (बाभळे), राजभाऊ वाघरे (धरणगाव), नयनभाऊ वाघरे (धरणगाव), भावेशभाऊ पाटील (गारखेडा), योगेशभाऊ पाटील जिग्नेशभाऊ पाटील (गारखेडा), प्रवीणभाऊ पाटील , रोनकभाऊ पाटील (बाभळे), राजभाऊ माळी (धरणगाव), बंटीभाऊ भदाणे (बिलखेडा) यांच्यासह धरणगाव तालुक्यातील शिवसेना व युवासेनेचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महानगरपालिका कर्मचारी महासंघाच्या कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा

### कर्मचारी हित, संघटन बळकटी आणि प्रशासनाशी समन्वयातून महानगरपालिकेच्या विकासाचा निर्धार

**जन सम्राट टाईम्स**

जळगाव | प्रतिनिधी: नगरपरिषद-महानगरपालिका कर्मचारी महासंघ, महाराष्ट्र प्रदेश (संलग्न भारतीय मजदूर संघ) यांच्या जळगाव शहर महानगरपालिका शाखेच्या वतीने आयोजित कार्यकारिणी पदग्रहण व सत्कार सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.कार्यक्रमात नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला तसेच कर्मचारी हित, संघटन बळकटी आणि महानगरपालिकेच्या विकासासाठी प्रशासन व कर्मचारी यांनी समन्वयाने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जळगाव शहरचे आमदार सुरेश (राजूमामा) भोळे होते, तर महापौर दीपमाला काळे यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. यावेळी उपमहापौर मनोज चौधरी, स्थायी समितीचे सभापती डॉ. चंद्रशेखर पाटील, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती सिंधुताई कोल्हे, भारतीय मजदूर



संघ महाराष्ट्र प्रदेशचे अध्यक्ष प्रभाकर बाणासुरे, संघटनमंत्री बाळासाहेब भुजबळ, ज्येष्ठ कार्यकर्ते पी. जे. आप्पा पाटील तसेच जिल्हा सचिव सचिन लाडवंजारी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उपस्थित मान्यवरांनी कर्मचारी संघटनांची भूमिका, प्रामाणिक सेवा, शिस्तबद्ध कार्यपद्धती आणि जनहिताला प्राधान्य देण्याचे महत्त्व अधोरेखित केले. कर्मचारी कल्याणासाठी संघटनेने प्रभावीपणे काम करण्यासह प्रशासनाशी समन्वय राखून महानगरपालिकेच्या विकासात योगदान देण्याचे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाला शाखाध्यक्ष गौरव सपकाळे, कार्याध्यक्ष समीर बोरोले, सचिव गौरव पुराणिक, उपाध्यक्ष अतुल पाटील, सहसचिव महेश ठाकूर, मुख्य सल्लागार योगेश बोरोले, सल्लागार योगेश वाणी, कोषाध्यक्ष शुभम कोतकर, प्रसिद्धी प्रमुख आकाश जगताप, संघटक संजय ठाकूर, चंद्रशेखर तायडे यांच्यासह सर्व कार्यकारिणी सदस्य, महानगरपालिका कर्मचारी आणि भारतीय मजदूर संघाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन जळगाव शहर महानगरपालिका शाखेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी यशस्वीरीत्या पार पाडले.

## रामानंद नगर पोलिसांची घरफोडी उघडकीस; दोन आरोपी अटकेत!

**जन सम्राट टाईम्स**

जळगाव | प्रतिनिधी: रामानंद नगर पोलिसांनी पिंप्राळा येथील पान मसाल्याच्या दुकानातील घरफोडीचा गुन्हा वेगाने उघडकीस आणत दोन आरोपींना अटक केली असून, चोरीस गेलेला ३७ हजार ८०० रुपयांचा संपूर्ण मुद्देमाल हस्तगत करण्यात यश मिळविले आहे.

७ जुलै २०२६ रोजी पिंप्राळा परिसरातील सोमानी मार्केट येथील पान मसाल्याच्या दुकानाचे शटर उचकटून अज्ञात चोरट्यांनी विविध कंपन्यांच्या सिगारेटचे १० बॉक्स आणि रोख रक्कम असा एकूण ३७,८०० रुपयांचा ऐवज लंपास केला होता. याप्रकरणी रामानंद नगर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०५ (अ), ३३१ (३) व ३३१ (४) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी पोलीस निरीक्षक मधुकर साळवे यांनी विशेष तपास पथकाची स्थापना केली.

गोपनीय माहिती, तांत्रिक विश्लेषण आणि परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पोलिसांनी तपासाची दिशा निश्चित केली. तपासादरम्यान सिद्धार्थ विनोद आढाळे (वय १९, रा. पिंप्राळा हुडको) आणि दीपक भगवान सोनवणे (वय २०, रा. पिंप्राळा हुडको) या दोघांना ताब्यात घेण्यात आले.

## न्यू इंग्लिश स्कूल नशिराबाद येथे 'माझे गाव आरोग्य संपन्न गाव' अंतर्गत जनजागृती संपन्न!

**जन सम्राट टाईम्स**

**नशिराबाद | प्रतिनिधी :** प्राथमिक आरोग्य केंद्र नशिराबाद अंतर्गत माझे गाव आरोग्य संपन्न गाव"* या मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी करत, स्थानिक न्यू इंग्लिश स्कूल, नशिराबाद येथे नुकताच एक विशेष जन-जागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना व नागरिकांना आरोग्याविषयी जागरूक करणे हा यामागचा मुख्य उद्देश होता. हात धुण्याची योग्य पद्धत:* विद्यार्थ्यांच्या आरोग्याची पायाभरणी म्हणून त्यांना साबणाने





हात धुण्याच्या शास्त्रीय पद्धतीचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. डेंग्यू, मलेरिया आणि अतिसार यांसारख्या आजारांची लागण कशी होते आणि त्यावर वेळीच प्रतिबंध कसा करावा, याविषयी सखोल मार्गदर्शन करण्यात आले. कोरडा दिवस (DRY DAY): डेंग्यूच्या लार्वा नष्ट करण्यासाठी प्रत्येक घरी 'कोरडा दिवस' पाळण्याचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून देण्यात आले. पाण्याची भांडी आठवड्यातून एकदा कशी कोरडी करावीत, याचे प्रात्यक्षिक ज्ञान देण्यात आले. या आरोग्यदायी आणि महत्त्वपूर्ण कार्यक्रमास अनेक मान्यवर उपस्थित होते: श्री. योगेश पाटील* (नगराध्यक्ष, नशिराबाद) श्रीमती. बनसोडे* (मुख्याध्यापिका, न्यू इंग्लिश स्कूल, नशिराबाद) डॉ. स्नेहा कोलते* याशिवाय, प्राथमिक आरोग्य केंद्राचे आरोग्य सहाय्यक आणि आशा स्वयंसेविका यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले.

जन सम्राट टाईम्स | अँकर न्यूज

## म्युनिसिपल हायस्कूल येथे दहावीच्या विद्यार्थ्यांचा बक्षीस समारंभ उत्साहात

### स्व. मंजुषा सुधाकर नारखेडे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ गुणवंतांचा गौरव

**जन सम्राट टाईम्स**

**भुसावळ। प्रतिनिधी:** नगरपरिषद संचलित म्युनिसिपल हायस्कूल, भुसावळ येथे शाळेच्या माजी विद्यार्थिनी स्व. मंजुषा सुधाकर नारखेडे (पूर्वाश्रमीच्या सुरेखा भंगाळे) यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ इयत्ता दहावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा बक्षीस समारंभ उत्साहात पार पडला. सन २०१२ पासून सुरू असलेल्या या उपक्रमांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील प्रथम व द्वितीय क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगरपरिषद शिक्षण समितीचे सभापती राजेंद्र आवटे होते. प्रमुख अतिथी म्हणून सुधाकर नारखेडे (पुणे), शाळेचे मुख्याध्यापक व्ही. पी. सुलताने,



सेवाज्येष्ठ शिक्षिका सरला सावकारे तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. प्रास्ताविक डॉ. प्रदीप साखरे यांनी केले. यावेळी सुधाकर नारखेडे यांनी गेल्या १४ वर्षांपासून विद्यार्थ्यांना पारितोषिक देण्यामागील प्रेरणा आणि स्मृतिप्रीत्यर्थ हा उपक्रम सुरू ठेवण्यामागील भावना व्यक्त केली. यंदा प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या कु. रोशनी विशाल परदेशी हिला १,५०१ रुपयांचा धनादेश, तर द्वितीय क्रमांक मिळविणाऱ्या आशिष विजय जाधव याला १,१०० रुपयांचा धनादेश प्रदान करण्यात आला. मनोगत व्यक्त करताना सुधाकर नारखेडे यांना पत्नीच्या आठवणीने भावूक होऊन अश्रू अनावर झाले. त्यांच्या भावनिक मनोगताने उपस्थितांचे वातावरण भारावून गेले. अध्यक्षीय भाषणात राजेंद्र आवटे यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत यशामागील मेहनत, सातत्य, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांच्या सहकार्याचे महत्त्व अधोरेखित केले. अपयशातून शिकून अधिक जोमाने पुढे जाण्याचा प्रेरणादायी संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. मुख्याध्यापक व्ही. पी. सुलताने यांनी शाळेच्या वतीने सुधाकर नारखेडे यांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एन. एच. राठोड यांनी केले.

### रोशनी परदेशी हिला 1,501 रुपयांचा धनादेश

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगरपरिषद शिक्षण समितीचे सभापती राजेंद्र आवटे होते.यावेळी सुधाकर नारखेडे यांनी गेल्या १४ वर्षांपासून विद्यार्थ्यांना पारितोषिक देण्यामागील प्रेरणा आणि स्मृतिप्रीत्यर्थ हा उपक्रम सुरू ठेवण्यामागील भावना व्यक्त केली. यंदा प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या कु. रोशनी विशाल परदेशी हिला १,५०१ रुपयांचा धनादेश, तर द्वितीय क्रमांक मिळविणाऱ्या आशिष विजय जाधव याला १,१०० रुपयांचा धनादेश प्रदान करण्यात आला. मनोगत व्यक्त करताना सुधाकर नारखेडे यांना पत्नीच्या आठवणीने भावूक होऊन अश्रू अनावर झाले. त्यांच्या भावनिक मनोगताने उपस्थितांचे वातावरण भारावून गेले.

## इम्पिरियल इंटरनॅशनल स्कूल, पाळधी येथे आषाढी एकादशी



**जन सम्राट टाईम्स**

**पाळधी | प्रतिनिधी :** इम्पिरियल इंटरनॅशनल स्कूल, पाळधी येथे शुक्रवार (दि. २४ जुलै) रोजी आषाढी एकादशीचा पवित्र उत्सव अत्यंत भक्तीमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी वारकरी परंपरेचे दर्शन घडवित विठ्ठल-रुक्मिणी, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम तसेच वारकऱ्यांच्या वेशभूषेत सहभागी होत कार्यक्रमाला विशेष रंगत आणली. कार्यक्रमाची सुरुवात शाळेचे चेअरमन इंजि. नरेश चौधरी यांच्या हस्ते विठ्ठल-रुक्मिणीच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर प्री-प्रायमरी विभागातील विद्यार्थ्यांनी विठ्ठल नृत्य, अभंग, भजन, हरिपाठ आणि विठ्ठल नामस्मरण सादर करून उपस्थितांना भक्तिरसात रंगवले. "ज्ञानोबा-तुकाराम"च्या जयघोषाने संपूर्ण शाळा परिसर भक्तिमय झाला. इम्पिरियल इंटरनॅशनल स्कूल, पाळधी येथे शुक्रवार (दि. २४ जुलै) रोजी आषाढी एकादशीचा पवित्र उत्सव अत्यंत भक्तीमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी वारकरी परंपरेचे दर्शन घडवित विठ्ठल-रुक्मिणी, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम तसेच वारकऱ्यांच्या वेशभूषेत सहभागी होत कार्यक्रमाला विशेष रंगत आणली.

# विशेष कार्यकारी अधिकारी नियुक्ती प्रक्रिया 10 दिवसांत पूर्ण करा : पालकमंत्री गुलाबराव पाटील

## नियुक्ती प्रक्रियेत महिलांसाठी किमान ३३ टक्के आरक्षण

जन सम्राट टाईम्स

**जळगाव। प्रतिनिधी:** जळगाव जिल्ह्यात विशेष कार्यकारी अधिकारी (एसईओ) नियुक्ती प्रक्रिया शासनाच्या निकषांनुसार पारदर्शक, गुणवत्ताधिष्ठित व वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश पालकमंत्री तथा पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिले. शासन निर्णय दिनांक ३ फेब्रुवारी २०२५ व ११ फेब्रुवारी २०२५ मधील सर्व निकषांचे काटेकोर पालन करून ही प्रक्रिया १० दिवसांत पूर्ण करण्याचे आदेश त्यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या आढावा बैठकीस आमदार किशोर आप्पा पाटील, आमदार अमोल पाटील, आमदार सुरेश (राजूमामा) भोळे, जिल्हाधिकारी रोहन घुगे, निवासी उपजिल्हाधिकारी वैशाली चव्हाण, उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) जितेंद्र कुवर यांच्यासह लोकप्रतिनिधी व संबंधित अधिकारी उपस्थित होते. वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, आमदार चंद्रकांत पाटील तसेच तहसीलदार व अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले. पालकमंत्री पाटील यांनी विशेष कार्यकारी अधिकारी हे शासन व नागरिकांमधील महत्त्वाचे दुवा असल्याचे सांगत प्रामाणिक, सेवाभावी, चारित्र्यसंपन्न व समाजाभिमुख व्यक्तींनाच संधी द्यावी, असे स्पष्ट निर्देश दिले. नियुक्ती



प्रक्रियेत महिलांसाठी किमान ३३ टक्के आरक्षण, लोकसंख्येनुसार निकष, उमेदवार किमान दहावी उत्तीर्ण असणे आणि चारित्र्य पडताळणी पूर्ण असणे बंधनकारक असल्याचे त्यांनी सांगितले. तहसीलदारांनी प्रस्तावांची सखोल छाननी करून पात्र उमेदवारांची यादी जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या. नियुक्तीनंतर विशेष कार्यकारी अधिकाऱ्यांना शासनाच्या योजना, अधिकार, कर्तव्ये, आचारसंहिता, आपत्ती व्यवस्थापन, कायदा-सुव्यवस्था, निवडणूक प्रक्रिया आणि जनजागृती मोहिमांबाबत प्रशिक्षण देऊन ओळखपत्र व नियुक्ती प्रमाणपत्र तातडीने वितरित करण्याचे निर्देशही देण्यात आले. यावेळी सर्व आमदारांना आपल्या मतदारसंघातील पात्र उमेदवारांचे प्रस्ताव दहा दिवसांच्या आत सादर करण्याचे आवाहन करण्यात आले. समित्यांमध्ये महिलांसह सर्व समाजघटकांचे संतुलित प्रतिनिधित्व राहील याची दक्षता घेण्यास सांगण्यात आले. अपात्र किंवा वादग्रस्त व्यक्तींची शिफारस टाळून संपूर्ण प्रक्रिया कायदेशीर, पारदर्शक आणि तक्रारविरहित पार पाडावी, असे पालकमंत्र्यांनी स्पष्ट केले. बैठकीत जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी शासन निर्णयानुसार नियुक्ती प्रक्रियेतील प्रत्येक टप्प्याचे काटेकोर पालन केले जाईल, अशी माहिती दिली. निवासी उपजिल्हाधिकारी वैशाली चव्हाण यांनी नियुक्ती प्रक्रियेबाबत सविस्तर सादरीकरण केले.

# जळगावातील ३२५ 'आपले सरकार' सेवा केंद्रे कायमस्वरूपी बंद!

जन सम्राट टाईम्स




**जळगाव | प्रतिनिधी:** जळगाव जिल्ह्यातील 'आपले सरकार' सेवा केंद्रांच्या कामकाजातील गंभीर अनियमितता आणि नागरिकांच्या सातत्यपूर्ण तक्रारींची दखल घेत जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी मोठी कारवाई करत तब्बल ३२५ सेवा केंद्रे कायमस्वरूपी बंद (ब्लॅकलिस्ट) करण्याचे आदेश दिले आहेत. या निर्णयामुळे निष्काळजी सेवा केंद्र चालकांमध्ये खळबळ उडाली आहे. जिल्हा प्रशासनाच्या तपासणीत संबंधित सेवा केंद्रे गेल्या सुमारे तीन महिन्यांपासून बंद असल्याचे आढळून आले. या केंद्रांद्वारे नागरिकांना विविध शासकीय दाखले व ऑनलाइन सेवा उपलब्ध करून देणे अपेक्षित असताना केंद्रे बंद असल्यामुळे नागरिकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत होती. याबाबत प्रशासनाकडे अनेक तक्रारी प्राप्त झाल्या होत्या.

जिल्हा प्रशासनाच्या तपासणीत संबंधित सेवा केंद्रे गेल्या सुमारे तीन महिन्यांपासून बंद असल्याचे आढळून आले. या पार्श्वभूमीवर संबंधित केंद्र चालकांना कारणे दाखवा नोटिसा बजावून स्पष्टीकरण मागविण्यात आले होते. मात्र, समाधानकारक उत्तर न मिळाल्याने जिल्हाधिकाऱ्यांनी ही केंद्रे कायमस्वरूपी बंद करण्याचा निर्णय घेतला. प्रशासनाने स्पष्ट केले की, शासकीय सेवा नागरिकांपर्यंत पारदर्शक, जलद आणि कार्यक्षमतेने पोहोचणे आवश्यक असून कामकाजातील निष्काळजीपणा किंवा अनियमितता कोणत्याही परिस्थितीत सहन केली जाणार नाही. या कारवाईनंतर जिल्ह्यातील इतर सेवा केंद्र चालकांनीही कामकाजात शिस्त व पारदर्शकता राखावी, असा संदेश प्रशासनाने दिला आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या या निर्णयाचे नागरिकांकडून स्वागत होत असून, यामुळे शासकीय सेवा अधिक प्रभावीपणे उपलब्ध होतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

जन सम्राट टाईम्स सत्याचे प्राईम्स ब्रेक न्यूज ज

# पारोळा कुटीर रुग्णालयातील विविध समस्यांबाबत वंचितचे निवेदन

## अस्थिरोग तज्ज्ञाची नियुक्ती, मानसिक आरोग्य सेवा



जन सम्राट टाईम्स

**पारोळा | प्रतिनिधी :** पारोळा येथील कुटीर रुग्णालयातील आरोग्य सेवा सुधाराव्यात आणि रुग्णांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांचे तातडीने निराकरण करावे, या मागणीसाठी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने संबंधित प्रशासनाला निवेदन देण्यात आले. हे निवेदन डॉ. साळुंखे यांना सादर करण्यात आले. निवेदनात रुग्णालयात कायमस्वरूपी अस्थिरोग तज्ज्ञाची नियुक्ती करणे, मानसिक आरोग्य विभागातील तज्ज्ञ डॉक्टरांची उपस्थिती नियमित ठेवणे, सफाई कर्मचाऱ्यांना आवश्यक स्वच्छता साहित्य उपलब्ध करून देणे, सर्व रुग्णांना एक्स-रे प्रिंट देण्याची सुविधा सुरू करणे, ऑनलाइन केसपेपर प्रिंट सेवा पुन्हा सुरू करणे तसेच कर्मचाऱ्यांवरील अतिरिक्त कामाचा ताण कमी करण्यासाठी स्वतंत्र कर्मचारी नियुक्त करण्याची मागणी करण्यात आली आहे. याशिवाय रुग्णालयाच्या कामकाजात कोणत्याही बाह्य व्यक्तीचा अनधिकृत हस्तक्षेप थांबविण्याचीही मागणी करण्यात आली. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, राष्ट्रीय महामार्गालगत असल्याने पारोळा कुटीर रुग्णालयात अपघातग्रस्त रुग्णांची संख्या मोठी असते. मात्र अस्थिरोग तज्ज्ञ उपलब्ध नसल्यामुळे अनेक रुग्णांना धुळे किंवा जळगाव येथे रेफर करावे लागते. मानसिक आरोग्य सेवा, स्वच्छता, एक्स-रे सुविधा आणि कर्मचारी व्यवस्थापनातील त्रुटींमुळे रुग्णांना गैरसोयींचा सामना करावा लागत असल्याचाही उल्लेख करण्यात आला आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, राष्ट्रीय महामार्गालगत असल्याने पारोळा कुटीर रुग्णालयात अपघातग्रस्त रुग्णांची संख्या मोठी असते. मात्र अस्थिरोग तज्ज्ञ उपलब्ध नसल्यामुळे अनेक रुग्णांना धुळे किंवा जळगाव येथे रेफर करावे लागते.संबंधित मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन आवश्यक कार्यवाही करण्यात यावी, अन्यथा लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी दिला. यावेळी तालुकाध्यक्ष दयाराम मोरे, सहसचिव राजेंद्र कांबळे, महासचिव श्रीकांत सोनवणे, शहराध्यक्ष कमलेश सोनवणे तसेच प्रसिद्धी प्रमुख राहुल सरदार उपस्थित होते.

# आजचा विद्यार्थी उद्याचा भविष्य आहे मात्र तो मिस गाईड आहे ?

देशाचे भविष्य घडविण्याची ताकद जर कोणामध्ये असेल तर ती विद्यार्थ्यांमध्ये आहे. म्हणूनच "आजचा विद्यार्थी हा उद्याचा शिल्पकार" असे अभिमानाने म्हटले जाते. मात्र आज देशभरातील विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे पाहिले, तर हा शिल्पकारच असुरक्षित आणि संभ्रमित झाल्याचे चित्र दिसून येते. स्पर्धा परीक्षा, पेपरफुटी, भरती प्रक्रियेतील अनियमितता, वाढती बेरोजगारी आणि शिक्षणातील वाढते प्रश्न यामुळे लाखो विद्यार्थ्यांच्या स्वप्नांवर पाणी फेरले जात आहे. नुकत्याच घडलेल्या कथित पेपरफुटी प्रकरणानंतर गल्लीपासून दिल्लीपर्यंत विद्यार्थ्यांनी आंदोलन, धरणे आणि उपोषणे करून न्यायाची मागणी केली. या आंदोलनाला विविध सामाजिक आणि विद्यार्थी संघटनांनी पाठिंबा दिला. विशेष म्हणजे भारतीय विद्यार्थी मोर्चा या संघटनेने जाहीरपणे विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला समर्थन देत त्यांच्या न्याय्य मागण्यांच्या बाजूने उभे राहण्याची भूमिका घेतली. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर स्पष्ट भूमिका घेण्याचा हा प्रयत्न अनेक विद्यार्थ्यांना दिलासादायक वाटला.




याच पार्श्वभूमीवर देशातील सर्वात मोठ्या विद्यार्थी संघटनांपैकी एक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (ABVP) कडूनही अनेकांना स्पष्ट भूमिका अपेक्षित होती. कारण ही संघटना अनेकदा विद्यार्थ्यांचे नेतृत्व करण्याचा आणि विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्याचा दावा करत असते. त्यामुळे पेपरफुटीसारख्या गंभीर प्रश्नावर तिची भूमिका काय होती, हा प्रश्न अनेक विद्यार्थ्यांच्या आणि पालकांच्या मनात निर्माण झाला आहे. येथे कोणत्याही संघटनेवर आरोप करणे हा उद्देश नाही. मात्र विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित इतक्या मोठ्या प्रश्नावर प्रत्येक विद्यार्थी संघटनेने आपली भूमिका स्पष्ट करणे ही लोकशाहीतील नैतिक जबाबदारी आहे. विद्यार्थ्यांना जेव्हा अन्याय झाल्याची भावना निर्माण होते, तेव्हा त्यांच्या पाठीशी उभे राहणे, शासनाकडे प्रश्न मांडणे, पारदर्शक चौकशीची मागणी करणे आणि विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी संघर्ष करणे, हेच विद्यार्थी संघटनांचे खरे कर्तव्य ठरते. विद्यार्थ्यांचे प्रश्न हे कोणत्याही राजकीय पक्षाचे किंवा विचारसरणीचे नसतात. ते देशाच्या भविष्याचे प्रश्न असतात. लाखो युवक वर्षानुवर्षे अभ्यास करतात, पालक कर्ज काढून शिक्षण देतात आणि एकच स्वप्न पाहतात— प्रामाणिकपणे परीक्षा देऊन नोकरी मिळवण्याचे. पण जर पेपरफुटी, गैरव्यवहार आणि व्यवस्थेतील त्रुटींमुळे त्यांचे भविष्य धोक्यात आले, तर त्या विद्यार्थ्यांच्या वेदनेला आवाज देणे ही प्रत्येक विद्यार्थी संघटनेची जबाबदारी आहे.

आज विद्यार्थ्यांना घोषणांपेक्षा कृतीची गरज आहे. त्यांच्या संघर्षाच्या वेळी कोण त्यांच्या सोबत उभे राहिले आणि कोणाची भूमिका काय होती, याचे मूल्यमापन विद्यार्थी स्वतः करतील. कारण विद्यार्थी आज सुजाण आहे; तो केवळ भाषणांवर विश्वास ठेवत नाही, तर प्रत्यक्ष कृतीकडे पाहतो.

# दिल्लीतील विद्यार्थ्यांवरील लाठीमाराच्या निषेधार्थ धुळ्यात आझाद समाज पार्टीचे धरणे आंदोलन!

## केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी

जन सम्राट टाईम्स

धुळे | प्रतिनिधी दिल्लीतील जंतर-मंतर येथे विद्यार्थ्यांवरील कथित लाठीमार आणि NEET परीक्षेतील कथित पेपरफुटी प्रकरणाच्या निषेधार्थ आझाद समाज पार्टी (काशीराम) आणि भीम आर्मी, धुळे जिल्ह्याच्या वतीने २५ जुलै रोजी धुळ्यात एकदिवसीय धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याची घोषणा पत्रकार परिषदेत करण्यात आली. धुळ्यात आयोजित पत्रकार परिषदेत पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांवरील कथित पोलिस लाठीमाराचा तीव्र निषेध नोंदवला. आंदोलनादरम्यान अनेक विद्यार्थी जखमी झाल्याचा तसेच काहींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करावे लागल्याचा दावा करण्यात आला. यावेळी NEET पेपरफुटी प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, विद्यार्थ्यांना न्याय द्यावा तसेच नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी करण्यात आली. प्रदेश महासचिव



दिलीप मोहिते यांनी २५ जुलै रोजी धुळ्यात व्यापक जनआंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती देत, संविधानवादी नागरिक, पालक आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन आंदोलनाला पाठिंबा द्यावा, असे आवाहन केले. सरकारने विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ थांबवून त्यांच्या न्याय्य मागण्यांकडे तातडीने लक्ष द्यावे, असा इशाराही यावेळी देण्यात आला.पत्रकार परिषदेला आझाद समाज पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश महासचिव तथा उत्तर महाराष्ट्र प्रभारी दिलीप मोहिते, जिल्हाध्यक्ष संजय चव्हाण (रावण), भीम आर्मीचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष राहुल वाघ, जिल्हाध्यक्ष सागर चव्हाण, युवा जिल्हाध्यक्ष दादाबाबा सोनवणे, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख राम सोनवणे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.धुळ्यात आयोजित पत्रकार परिषदेत पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांवरील कथित पोलिस लाठीमाराचा तीव्र निषेध नोंदवला. आंदोलनादरम्यान अनेक विद्यार्थी जखमी झाल्याचा तसेच काहींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करावे लागल्याचा दावा करण्यात आला. यावेळी NEET पेपरफुटी प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, विद्यार्थ्यांना न्याय द्यावा तसेच नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी करण्यात आली. प्रदेश महासचिव दिलीप मोहिते यांनी २५ जुलै रोजी धुळ्यात व्यापक जनआंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती देत, संविधानवादी नागरिक, पालक आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन आंदोलनाला पाठिंबा द्यावा, असे आवाहन केले.

# 'शिबिरातून सर्वसामान्यांची सेवा हीच खरी ईश्वरी सेवा' – पालकमंत्री गुलाबराव पाटील

जन सम्राट टाईम्स

**जळगाव। प्रतिनिधी:** 'छत्रपती शिवाजी महाराज महा राजस्व अभियान' अंतर्गत धरणगाव येथे आयोजित भव्य समाधान शिबिरात दोन हजारांहून अधिक लाभार्थ्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ देण्यात आला. या शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जळगावचे




पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी "शिबिराच्या माध्यमातून सर्वसामान्यांची सेवा करणे हीच खरी ईश्वरी सेवा आहे," असे प्रतिपादन केले. पालकमंत्री म्हणाले, शासनाची सेवा प्रत्येक पात्र नागरिकापर्यंत जलद, पारदर्शक आणि सुलभ पद्धतीने पोहोचली पाहिजे. नागरिकांच्या चेहऱ्यावरील समाधान हेच प्रशासनाच्या कार्याचे खरे यश असून, अशा लोकाभिमुख उपक्रमांमुळे शासन आणि नागरिकांमधील विश्वास अधिक दृढ होत आहे.

# आंदोलनावरील कारवाई निषेधार्थ समता सैनिक दलाचे आंदोलन!

## विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर निर्णयाची मागणी




जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी :** दिल्लीतील विद्यार्थी-युवा आंदोलनादरम्यान झालेल्या कथित पोलिस कारवाईच्या निषेधार्थ समता सैनिक दल, महाराष्ट्र राज्याच्या वतीने जळगाव येथे आंदोलन करण्यात आले. राज्य संघटक विजय निकम यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनानंतर भारताच्या राष्ट्रपतींना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत निवेदन सादर करण्यात आले. यावेळी विजय निकम यांनी भारतीय संविधानाने नागरिकांना शांततापूर्ण आंदोलन आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा मूलभूत अधिकार दिला असल्याचे सांगत, विद्यार्थ्यांच्या कथित दमनाऐवजी शासनाने संवाद साधून त्यांच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी भूमिका मांडली. समता सैनिक दलाने सादर केलेल्या निवेदनात दिल्लीतील घटनेची सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली निष्पक्ष व कालबद्ध चौकशी, दोषींवर कठोर कारवाई, जखमी विद्यार्थी-युवांना आर्थिक मदत व उपचार, आंदोलनकर्त्यांवरील कथित गुन्ह्यांचे पुनरावलोकन, विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय तसेच शांततापूर्ण आंदोलनाच्या संविधानिक अधिकाराचे संरक्षण करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच, चौकशीत जबाबदारी निश्चित झाल्यास केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली आहे. विजय निकम यांनी केंद्र सरकारने तातडीने सकारात्मक भूमिका न घेतल्यास समता सैनिक दल राज्यभर लोकशाही मार्गाने व्यापक जनआंदोलन उभारेल, असा इशाराही दिला. आंदोलनादरम्यान "जय भीम", "जय संविधान", "लोकशाही वाचवा – संविधान वाचवा", "विद्यार्थ्यांवरील अन्याय बंद करा" अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.

# न्यू इंग्लिश स्कूल प्राथमिक विद्यामंदिर भक्तिरसात रंगली आषाढी दिंडी

## विद्यार्थ्यांच्या अंगावर वारकरी वेशभूषा, टाळ-मृदुंगाचा गजर आणि "विठ्ठल, विठ्ठल..." जयघोष...

जन सम्राट टाईम्स

**नशिराबाद:| प्रतिनिधी :** विद्यार्थ्यांच्या अंगावर वारकरी वेशभूषा, टाळ-मृदुंगाचा गजर आणि "विठ्ठल, विठ्ठल..." असा जयघोष... अशा भक्तीमय वातावरणात न्यू इंग्लिश स्कूल प्राथमिक विद्यामंदिर, नशिराबाद येथे आषाढी एकादशीच्या पवित्र मुहूर्तावर आषाढी दिंडी सोहळा अत्यंत उत्साहात संपन्न झाला. या दिंडीच्या माध्यमातून शाळा परिसरात भक्ती संस्कार आणि सांस्कृतिक परंपरांचा सुंदर संगम पाहायला मिळाला. *दिंडी सोहळ्याची विद्यार्थ्यांनी



विठ्ठल-रुक्मिणी, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम महाराज आदी संतांच्या वेशभूषेत सादरीकरण करत वारकरी संप्रदायाचे सजीव दर्शन घडवले.

कार्यक्रमाची सुरुवात विठ्ठल-रुक्मिणीच्या प्रतिमेचे पूजन व आरतीने झाली. त्यानंतर इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या बहारदार वारकरी नृत्यातून वारकरी संस्कृतीची ओळख करून दिली.

शाळेच्या पटांगणातून टाळ-मृदंगाच्या तालावर आणि पालखीसह दिंडी काढण्यात आली.

या आनंदोत्सवात बालवाडी विभाग, प्राथमिक विभागातील इयत्ता पहिली, दुसरी तसेच इयत्ता पाचवीचे विद्यार्थीही मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते. या संस्मरणीय कार्यक्रमास अनेक मान्यवर उपस्थित होते: *श्री. योगेश पाटील* (नगराध्यक्ष, नशिराबाद नगर परिषद तथा संस्थेचे कार्याध्यक्ष) श्री. विनायक वाणी* (उपाध्यक्ष) श्री. मधुकर चौबे* (सचिव) श्री. जनार्दन माळी व श्री. राजेश पाटील* (संचालक) ॲड. प्रदीप देशपांड श्रीमती सुनिता बनसोडे* (माध्यमिक मुख्याध्यापिका) व *श्री. प्रवीण महाजन* (प्राथमिक मुख्याध्यापक) यावेळी आपल्या मनोगतात बोलताना संस्थेचे कार्याध्यक्ष योगेश पाटील म्हणाले की, "आजच्या पिढीपर्यंत वारकरी संस्कृती आणि संतांचे विचार पोहोचवणे ही आपली सर्वांची नैतिक जबाबदारी आहे." माझे गाव आरोग्य संपन्न गाव' अंतर्गत आरोग्य जनजागृती:* आषाढी दिंडीच्या या सांस्कृतिक कार्यक्रमासोबतच, प्राथमिक आरोग्य केंद्र, नशिराबादच्या वतीने विशेष जनजागृती सत्र पार पडले. वैद्यकीय अधिकारी *डॉ. स्नेहा कोलते* आणि आशा सेविका *मंगला पिंगळे* यांनी *'माझे गाव आरोग्य संपन्न गाव'* या मोहिमेअंतर्गत उपस्थितांना आरोग्याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले. सर्वांनी आपला परिसर आणि गाव नेहमी स्वच्छ व सुंदर ठेवावा, असा महत्त्वाचा संदेश त्यांनी यावेळी दिला. आयोजन व परिश्रम:* या संपूर्ण कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन *स्वाती अत्तरदे, नयना भंगाळे, सुनीता शिवरामे आणि स्वाती चौधरी* यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी-पालकवृंदाने विशेष परिश्रम घेतले.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306